आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१३ फेब्रुवारी २०२४ - मंगळवार

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. मुंबईच्या भाजपा मुख्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चव्हाण यांचं पक्षात स्वागत केलं. चव्हाण यांनी कालच काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. मिलिंद देवरा आणि बाबा सिद्दीकी या दोन प्रमुख नेत्यांनंतर अशोक चव्हाण काँग्रेस पक्षातून बाहेर पडल्यानं काँग्रेसला हा मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे. अशोक चव्हाण यांच्याबरोबर माजी आमदार अमर राजूरकर यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. अशोक चव्हाण यांच्या प्रवेशाने भाजप आणि महायुतीची शक्ती वाढली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देशाला विकसित करण्याच्या मार्गावर अग्रेसर असल्याने देशभरातील अनेक नेत्यांना मुख्य प्रवाहात काम करावं, असं वाटत असून ते भाजपमध्ये येत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सांगितलं. अशोक चव्हाण यांना राज्यसभा उमेदवारी देण्याच्या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय नेतृत्व याबाबतचा निर्णय घेईल. तर अशोक चव्हाण यांनी आज भाजपमध्ये बिनशर्त प्रवेश केला. त्यांनी कोणत्याही पदाची अपेक्षा केलेली नाही असं बावनकुळे म्हणाले. भाजपच्या वाढीसाठी आणि निवडणुकीत अधिकाधिक जागा निवडून देण्यासाठी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. व्यक्तिगत निर्णय म्हणून पक्ष सोडल्याचं अशोक चव्हाण यांनी आज सांगितलं. भाजपा प्रवेशावेळी कोणतीही मागणी केलेली नाही आणि दिली ती जबाबदारी स्वीकारू असंही ते म्हणाले. काँग्रेसच्या कोणत्याही आमदाराला किंवा सदस्याला भाजपामध्ये येण्यासाठी आग्रह केला नाही असंही चव्हाण यांनी स्पष्ट केलं. मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी भाजपा मध्ये दाखल होतील. येत्या काही दिवसात हा आकडा स्पष्ट होईल, अशी प्रतिक्रिया भाजपा नेते गिरीश महाजन यांनी व्यक्त केली. तर भाजपा ईडी आणि सीबीआयच्या माध्यमातून दबाव तंत्राचा वापर करून काँग्रेस नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश करण्यास भाग पाडत आहेत, असा आरोप काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांनी केला आहे.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचा पक्षच राष्ट्रवादी काँग्रेस असून त्याला घड्याळ हे पक्षचिन्ह बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. दरम्यान अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हिएट दाखल केली आहे.

**<><><><><>**

पशुपालन, मत्स्य शेती आणि दुग्धव्यवसाय या क्षेत्रात गुंतवणूक, उद्योग आणि रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं आहे. महाराष्ट्र पशु आणि मत्स्यविज्ञान विद्यापीठाच्या ११ व्या दीक्षांत समारंभाला आज ते दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढविण्यात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालनाची भूमिका महत्वाची असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचवण्यासाठी आयोजित विकसित भारत संकल्प यात्रेचा दुसरा टप्पा ठाणे शहरात सुरु आहे. ठाण्यातल्या दिपाली कालेकर यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

**होल्ड- बाईट- दिपाली कालेकर**

**<><><><><>**

आज माघ शुक्ल चतुर्थी अर्थात माघी श्री गणेश जयंती. राज्यात अनेक ठिकाणी आजपासून माघी गणेशोत्सवाला प्रारंभ झाला. त्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांमधे गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना आज करण्यात आली.

**<><><><><>**

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी   जे. ई. ई. मेन्स,  अर्थात संयुक्त प्रवेश परीक्षा २०२४ च्या मुख्य परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेत १०० पर्सेंटईल मिळवणाऱ्या एकूण २३ विद्यार्थ्यांपैकी ३ महाराष्ट्रातले आहेत. अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या पहिल्या फेरीत  ११ लाख ७० हजारापेक्षा जास्त उमेदवारांनी परीक्षा दिली होती, अशी माहिती राष्ट्रीय चाचणी संस्थेनं दिली.

<><><><><><>

कम्युनिटी रेडियो केंद्रांनी सरकारी माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून देशाला विकसित भारत बनवण्यामध्ये हातभार लावावा, असं आवाहन अनुराग ठाकूर यांनी  केलं आहे. ते आज चेन्नई मध्ये आयोजित दक्षिण विभाग कम्युनिटी रेडिओ संमेलनाला संबोधित करताना बोलत होते. एका परवान्यावर एक पेक्षा जास्त केंद्र उभारता यावीत, या दृष्टीनं याबाबतच्या धोरणात आवश्यक बदल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><><>

जागतिक रेडिओ दिन आज साजरा होत आहे. ज्ञान, माहिती आणि मनोरंजन देणारं शतक अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे.  यानिमित्त आकाशवाणीच्या प्रधान महासंचालक वसुधा गुप्ता यांनी आज सकाळी दिलेल्या संदेशात, आकाशवाणीच्या कार्यक्रमांचं आणि बातम्यांचं महत्त्व आजही अबाधित आहे, असं म्हटलं आहे.

//<><><><><><>//